**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 07.02.2025** **वार- शुक्रवार**

---

**जीबीएस**

गुलेन बॅरी सिंड्रोम या आजाराच्या रुग्णांचं सविस्तर विश्लेषण आरोग्य यंत्रणा करत आहे. 'जीबीएस'च्या रुग्णांना रुग्णालयातून घरी पाठवताना त्यांचे शौच आणि रक्त नमुने संकलित करण्याबाबत 'राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेने पुणे महापालिकेला पत्र पाठवलं आहे. त्यानुसार महापालिकेच्या आरोग्य विभागानं खासगी रुग्णालयांना सूचना दिल्या आहेत. रुग्णांचे नमुने तपासणीसाठी 'एनआयव्ही'कडे पाठवले जाणार असल्याची माहिती पुणे महापालिका आरोग्यप्रमुख डॉक्टर निना बोराडे यांनी दिली. पिंपरी चिंचवडमध्ये गेल्या तीन दिवसात जीबीएसचा एकही रुग्ण आढळला नाही. शहरात आतापर्यंत या आजाराचे 22 रुग्ण आढळले असून एकाचा मृत्यू झाला आहे. एका रुग्णाला जीवरक्षक प्रणालीवर ठेवण्यात आलं आहे. या आजराच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने 16 वैद्यकीय पथकं तयार केली असून 23 हजारांपेक्षा जास्त घरांचं सर्वेक्षण करण्यात आलं आहे.

**सुप्रिया सुळे**

भोर आणि राजगड तालुक्यातील महामार्गांवर असलेल्या उड्डाण पूलांच्या भिंतींवर त्या त्या ठिकाणचा इतिहास दर्शविणारी भित्तिचित्र रेखाटावीत, तसंच दिशादर्शक फलक लावावेत, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्राकडे पत्राद्वारे केली आहे. याबाबत त्यांनी केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पत्र लिहिलं आहे. बारामती लोकसभा मतदार संघातील भोर आणि राजगड या तालुक्यांना उज्ज्वल ऐतिहासिक वारसा लाभला आहे. या भागात येणारे शिवप्रेमी तसंच पर्यटकांच्या सुविधेसाठी आणि पर्यटनाला गती मिळावी यासाठी मार्गदर्शक फलक लावावेत असं सुळे यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

**मिळकत कर**

2025-26 या आर्थिक वर्षात मिळकत करात कोणतीही वाढ न करण्याच्या पुणे महापालिकेच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. त्यामुळे पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. गेल्या नऊ वर्षापासून पुणेकरांच्या मिळकत करात वाढ झालेली नाही. पुणे महापालिकेचं 2025-26 या

आर्थिक वर्षांचं अंदाजपत्रक तयार करण्याचं काम सुरू आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने 20 फेब्रुवारीपूर्वी करवाढीबाबतचा निर्णय घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे महापालिकेच्या मिळकत कर संकलन विभागाकडून याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता. त्याला आज मान्यता देण्यात आली आहे.

**अमितेश**

आमदार हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा अभियानाला पोलीस विभागाचं देखील संपूर्ण सहकार्य असेल, पोलीस ठाण्याच्या परिसराच्या स्वच्छतेबरोबरच कारवाईमध्ये जप्त करण्यात आलेली वाहनं अस्ताव्यस्त पडणार नाहीत, याची देखील आम्ही काळजी घेऊ, असं पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं. आमदार हेमंत रासने यांच्या माध्यमातून राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ, सुंदर आणि विकसित कसबा अभियाना अंतर्गत स्वच्छता दुतांसाठी इंदौरचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्याचा प्रस्थानपूर्व समारंभ पुणे महापालिकेत मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी अमिएत्श कुमार बोलत होते.

**आंदोलन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण कृती समितीच्या वतीने आज पुण्यात मोर्चा आणि धरणे आंदोलन करण्यात आलं. मालधक्का चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन आणि प्रस्तावित स्मारकासाठी राखीव असलेला भूखंड, स्मारकालाच द्यावा, बांधकाम व्यावसायिकाला देऊ नये, ही जागा स्मारकाला दिली नाही, तर राज्यभर तीव्र स्वरूपाचं आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. या मागणीचं निवेदन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना दिले.

**मैदानी स्पर्धा**

इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये दिनेश फड याने लांब उडीमध्ये प्रथम क्रमांक तसेच उंच उडी आणि तिहेरी उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून वैयक्तिक तीन बक्षिसं पटकावली. दीपक कबाडे याने 800 मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि 1500 मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून दोन बक्षीस पटकावली. अथर्व रेणुसे याने 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला. रिले स्पर्धेमध्ये मुलींच्या गटामध्ये राघवी भापकर, प्रतीक्षा तळपे, सुहानी गीते आणि वैष्णवी नागरे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान 34 अंश तर किमान तापमान 16 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि आकाश निरभ्र राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**